दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● रविवार दि.१४ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Sunday 14 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 29 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# साहित्य संस्कृती जपण्यासाठी तरुण पिढीने पुढे येण्याची गरज : उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

साहित्य व नाट्यकलेच्या माध्यमातून समाज जागृतीचा प्रभावी संदेश देणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. तरुण पिढीने मराठी भाषा, संस्कृती व परंपरेचे संवर्धन करत नव्या कल्पनाशक्तीने साहित्य संस्कृती जपण्यासाठी पुढे येण्याची गरज असल्याचे प्रतिपादन उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले. शहरातील छत्रपती शाहू महाराज सभागृह, न्यू आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज येथे महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा सावेडी उपनगर आयोजित राज्यस्तरीय युवा साहित्य-नाट्य संमेलन २०२५ च्या समारोप सोहळ्याप्रसंगी मंत्री डॉ. सामंत बोलत होते.यावेळी जयंत येलूलकर,डॉ. प्रशांत भालेराव, ड. दीपलक्ष्मी म्हसे, गौरी देशपांडे, विश्वासराव आठरे, चंद्रकांत पालवे, मकरंद कुलकर्णी, डॉ. गोपाळ बहुरुपी आदी उपस्थिती होते.मंत्री डॉ. सामंत म्हणाले, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. मराठी भाषेच्या उद्धारासाठी, समृद्धीसाठी, मराठी भाषा जतन करण्यासाठी मराठी भाषेची बृहन्मराठी मंडळे देशाच्या प्रत्येक






राज्यामध्ये असणे आवश्यक आहेत. तसेच मायमराठीला सातासमुद्रापलिकडे नेण्यासाठी परदेशातही बृहन्मराठी मंडळे आवश्यक आहेत. पुढच्या वर्षापर्यंत जगभरातील ५० देशात बृहन्मराठी मंडळे निर्माण करण्यात येतील, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. साहित्य आणि नाट्यक्षेत्र एक करत उत्तम अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. साहित्य निर्माण होत नाही तोपर्यंत रंगमंचावर नाटक, चित्रपट निर्माण होऊ शकत नाही, त्यामुळे साहित्याला अनन्यसाधारण महत्व आहे. साहित्य संस्कृती जपण्यासाठी अशी संमेलने अत्यंत उपयुक्त असल्याचेही ते म्हणाले.पुण्यामध्ये असलेल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात मराठीमधून शिक्षण देण्यात येत आहे. येणाऱ्या काळात वैद्यकीय शिक्षण मराठीमधून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे सांगत छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर यांनी दिलेल्या मराठीला जपण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करण्याची गरज आहे. युवा पिढीने देशासाठी, आपल्या भाषेसाठी आपण काय करु शकतो याचे आत्मचिंतन करण्याची आवश्यकता असल्याचेही डॉ. सामंत यावेळी यांनी सांगितले.समारोप सोहळ्याचे प्रास्ताविक जयंत येलूलकर यांनी केले. विश्वास आठरे पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.यावेळी साहित्यिकांचा डॉ. उदय सामंत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

# कोंडाईबारी घाटात भीषण अपघात

## ब्रेक फेल झाल्याने कंटेनर चालकाचा जागीच मृत्यू

**नवापूर । रसिक गावित**

धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावरील कुप्रसिद्ध कोंडाईबारी घाटात पुन्हा एकदा रक्ताचा अभिषेक झाला आहे. आज सकाळी दर्ग्याजवळ घडलेल्या एका भीषण अपघातात कंटेनर आणि ट्रेलर यांच्यात धडक होऊन एका चालकाचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण जखमी झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, हैदराबादहून अहमदाबादकडे जात असलेल्या कंटेनर (क्रमांक जिटी २७ टीटी १२८७) चालकाचे नियंत्रण सुटले आणि ब्रेक फेल झाल्याने तो समोर चाललेल्या ट्रेलरवर (क्रमांक एम एच ४० ऐके ९४५१) आदळला. ही धडक इतकी जोरदार होती की, कंटेनरचे लोखंडाचे तुकडे रस्त्यावर विखुरले आणि वाहन पूर्णपणे चिरडले गेले.




या अपघातात कंटेनर चालक महेंद्रसिंग शेखावत (वय ३८, राहणार शिखर, राजस्थान) यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. क्लिनर विनोद्कुमार दत्ताराम जाट (वय ३९, राहणार हनुमानगड, राजस्थान) याला किरकोळ दुखापत झाली असून, त्याला तात्काळ विसरवाडी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती. महामार्ग पोलिस आणि स्थानिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले आणि वाहतूक सुरळीत केली.गेल्या काही काळात कोंडाईबारी घाट हा अपघातांचे केंद्र बनला आहे. वारंवार घडणाऱ्या या अपघातांमुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, प्रशासनाकडून ठोस उपाययोजनांची मागणी होत आहे. विसरवाडी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# तळोदा उपजिल्हा रुग्णालयाच्या दयनीय अवस्थेविरोधात 'शिवसेने'चा इशारा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा येथील उपजिल्हा रुग्णालयातील सुविधांचा अभाव आणि अपुऱ्या मनुष्यबळामुळे गोरगरीब रुग्णांचे हाल होत आहेत. या गंभीर समस्यांवर तातडीने उपाययोजना न झाल्यास, तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने दिला आहे. शहरप्रमुख देवेंद्र कलाल यांच्या नेतृत्वाखाली सार्वजनिकरित्या आरोग्यमंत्र्यांना निवेदन देत रुग्णालयाची दयनीय अवस्था निदर्शनास आणून देण्यात आली आहे.



रुग्णालयातील प्रमुख समस्या: रुग्णालयातील अनेक पदे रिक्त असून, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे. यामुळे रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत.रक्त संकलन केंद्र अद्याप सुरू झालेले नाही, ज्यामुळे सिकल सेल रुग्ण, गर्भवती महिला आणि इतर गंभीर रुग्णांना रक्तासाठी वणवण करावी लागत आहे. रुग्णालयात फक्त एकच रुग्णवाहिका असून, ती वारंवार बंद पडते. त्यामुळे तातडीच्या परिस्थितीत रुग्णांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागते. या निवेदनात उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याची, कायमस्वरूपी तज्ज्ञ डॉक्टर व कर्मचारी नेमण्याची, रक्त संकलन केंद्र सुरू करण्याची आणि किमान दोन रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागण्या मान्य न झाल्यास, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आक्रमक आंदोलन करेल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. या आंदोलनाची संपूर्ण जबाबदारी शासन आणि प्रशासनाची असेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदना वर शहर प्रमुख देवा कलाल,तालुका प्रमुख शिवसेना विपुल कुलकर्णी अध्यक्ष व्यापारी महासंघ तळोदा आनंद सोनार,तुषार भांडारकर, हर्षल चौधरी, संजय पटेल, निखिल सोनार, भूषण सोनार, जितू गुरव,महेश कलाल,भूपेश कलाल,दिपू कलाल व असंख्य नागरिकांच्या सह्या निवेदनवर आहेत.

# बोतवी नदीत बुडून तरुणाचा मृत्यू कपडे धुताना तोल गेल्याने अपघात

**मोलगी । रवींद्र वळवी**

अक्कलकुवा तालुक्यातील मोकस गावाजवळच्या बोतवी नदीत कपडे धुताना तोल जाऊन बुडाल्याने एका ४५ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना आज, १३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. बाज्या यवसावे (रा. मोकस नालीपाडा) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बाज्या यवसावे हे मोकस गावातील बोतवी नदीवर अंघोळ करण्यासाठी गेले होते. अंघोळीनंतर ते नदीकाठावरील एका मोठ्या पाण्याच्या डबक्याजवळ कपडे धुवत होते. याचवेळी अचानक त्यांचा तोल गेला आणि ते खोल पाण्यात पडले. पाण्याचा अंदाज न आल्याने आणि पोहता येत नसल्यामुळे त्यांचा बुडून मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि मोलगी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाचे शवविच्छेदन वडफळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात करण्यात आले.

मृत बाज्या यांचा भाऊ राज्या यवसावे यांनी याबाबत मोलगी पोलीस ठाण्यात माहिती दिली. या प्रकरणी मोलगी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल वनसिंग पाडवी करत आहेत. या घटनेमुळे मोकस गावावर शोककळा पसरली आहे.

# एस.आय.टी समितीला खरी व सत्य माहिती दिल्याबद्दल नवनिर्वाचित मुख्याध्यापक रडारवर -रणजित देशमुख

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेला शिक्षक भरती गोटाला, या घोटाळ्याची सखोल चोकशी करण्यासाठी राज्याचे मुख्यामंत्री व शिक्षण मंत्री यांनी ड खढची स्थापना केली, एस.आय टी. येणार नाही, आमचे काहीही होणार नाही या अविरभावात फिरणारे संस्थाचालक ग बोगस शिक्षक हे राजरोस पणे फिरत होते, परंतु राज्याचे कर्तवदक्ष मुख्यमंत्री यानी स्थापना केलेल्या समितीने काम सुरु केले, आणि या बोगस भरती करणाऱ्याचे धाबे दानाणले असे रणजित देशमुख यांनी म्हटले आहे.याचेच उदाहरण म्हणजे बीड जिल्यातील परळी वैजनाथ येथील वैद्यनाथ विद्यालय या नामांकित शाळेत अंधाधुन्ड कारभार सुरु होता, एका मुख्याध्यपकाने आत्महत्या केली तर दुसरा मुख्याद्यापक जेल मध्ये ही गेला, या नंतर म्हणजे २०१९ पासून मागील ऑगस्ट २०२५ पर्यंत म्हणजे तब्बल ६ वर्ष शाळेला मुख्याध्यपक च नव्हता एस.आय.टी.च्या समितीला शाळेची संपूर्ण माहिती गोळा करावायची असल्यामुळे व शासन आदेशामुळे , मा शिक्षणाधिकारी (माध्यमिक यांनी



सर्व कागदपत्राची छाननी करून सर्व नियमात बसतील असे शाळेळेतील जेष्ठ शिक्षक यांना ऑगस्ट महिन्यात मुद्याद्यापक पदी आदेश दिले आणि इथेच खेळ बिघडला नवीन मुख्याध्यपक शाळेत कार्यरत होताच, बोगस शिक्षक शाळेतून गायब झाले, बोगस शिक्षक असल्यामुळे त्यांना विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान शी काहीही देणेघेणे नसल्यामुळे त्यांनी शाळेची पायरी ही चढली नाही,परंतु या बोगस शिक्षकांनी नवनिर्वाचित मुख्याध्यपक हा का नेमला म्हणून शिक्षणाधिकारी कार्यालयात दररोज जाऊन गोंधळ घालण्यास सुरुवात केली, एस.आय. टी. समितीची टीम तपासासाठी शाळेत आलेली असताना ही हे बोगस शिक्षक शाळेत गैरहजर राहिले, व वरून हेच बोगस शिक्षक दररोज शिक्षणाधिकारी यांच्या दालनात जाऊन गोंधळ घालत असल्याचे कळले, कुठल्याही परिस्तिथी मध्ये मुख्याध्यपक पद रद्द करण्यासाठी शिक्षणाधिकारी यांच्यावर दबाव टाकत असून जातीपातीचा आधार घेत आहेत, आणि या सर्व कामामध्ये शिक्षणाधिकारी कार्यालयातील कर्मचारी ही सहभागी आहेत, शिक्षणाधिकारी यांनी कुठल्याही दबावला बळी पडून जर मुख्याध्यपक पद रद्द केले तर जणअंदोलन उभा करून रद्द पद करण्याचे कारण विचारले जाईल याची दक्षता घ्यावी व बीड जिल्याला या बोगस शिक्षक भरती घोट्याळ्यातील दोशीना पाठीनी घालू नये हे लक्षात घ्यावे असे रणजित देशमुख यांनी म्हटले आहे.

# मांजरा धरणाचे दोन दरवाजे ०.२५ मिटरने उघडले नियंत्रित पाणी विसर्ग सुरू;नदीकाठ च्या नागरिकांनी सतर्क राहावे प्रशासनाचा इशारा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मांजरा प्रकल्प पूर्ण क्षमतेच्या उंबरठ्यावर पोहोचला असून दि.१३ सप्टेंबर २०२५ दुपारी १६.१५ वाजेपर्यंत प्रकल्पातील जलसाठा ९९.२१ टक्के इतका झाला आहे.गेल्या काही दिवसांपासून पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या पावसामुळे धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक सुरूच आहे.धरणाची पाणी पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरण प्रशासनाने आज दुपारी नियंत्रित पाणी विसर्ग सुरू केला आहे.प्रकल्प प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार,शनिवारी दुपारी १६.१५ वाजता धरणातील क्रमांक १ आणि ६ वक्रद्वारे प्रत्येकी ०.२५ मीटर उंचीने उघडण्यात आले असून,मांजरानदीपात्रात एकूण १,७४७.१४ क्यूसेक्स (४९.४८ क्यूमेक्स) इतक्या प्रमाणात पाणी सोडण्यात आले आहे. ही विसर्गाचीसुरुवातीची पातळी असून धरणात येणाऱ्या पाण्याच्या प्रमाणानुसार विसर्गात आवश्यकतेनुसार वाढ किंवा घट केली जाणार आहे.दरम्यान, प्रशासनाने नदीकाठा वरील गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.पुरनियंत्रण कक्षाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या सूचनेत,नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी सतर्क राहावे,कोणीही नदीपात्रात प्रवेश



करू नये.जिवीत अथवा वित्तहानी टाळण्यासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे असे आवाहन करण्यात आले आहे.गेल्या काही दिवसांत प्रकल्प परिसरात आणि पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे धरणातील पाणी साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.त्यामुळे प्रशासन धरणातील पाणी पातळी सतत लक्षात ठेवून नियंत्रित विसर्ग करून नदीकाठावरील गावांना इशारे देत आहे.

तज्ज्ञांच्या मते,येत्या काही दिवसांत पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणातून होणाऱ्या पाणी विसर्गाचे प्रमाण वाढू शकते.यामुळे नदीकाठा वरील गावांनी प्रशासनाशी संपर्कात राहून सुरक्षित स्थळी स्थलांतराची तयारी ठेवावी,असा सल्लाही तज्ज्ञांकडून देण्यात आला आहे.

# अंबादास दानवे यांची बीड व धाराशीव जिल्ह्याच्या संपर्कनेते पदी नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेना नेते अंबादास दानवे यांची बीड व धाराशीव जिल्ह्याच्या संपर्कनेते पदी नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून प्रसिद्धीस देण्यात आलेल्या रात पत्रकाद्वारे कळविण्यात आली आहे. दरम्यान आगामी जिल्हा परिषद, पंचायत दानवेंच्या नियुक्तीने ठाकरेंच्या शिवसैनिकांमध्ये उत्साह समिती आणि नगर पालिका निवडणूकीच्या अनुषंगाने दानवे यांची झालेली नियुक्ती शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातील शिवसैनिकांसाठी महत्वाची मानली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांवरील पकड निर्माण करण्याच्या दृष्टीने शिवसैनिकांमध्ये उत्साहा संचारला आहे. दानवे यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांकडून स्वागत होत आहे.



संपादकीय

## कसरतीची चौथी फेरी



उरलेसुरले वस्त्रहरण रोखण्यासाठी उबाठा गटाच्या चाललेल्या कसरतींमधला आणखी एक अंक गुरुवारी पार पडला. दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याचा प्रयत्न सुरू केल्यानंतर ही कसरतीची चौथी फेरी आहे, असं सांगितलं गेलं. राजकीय पक्ष एकत्र येतात. विलगही होतात. पण, त्याला जनतेच्या आस्थेचं, भल्याचं काही कारण असतं. यांच्या एकत्र येण्यात तसं काही दिसत नाही. भरपूर मार खाल्लेल्या, सगळीकडून हरून आलेल्या, थकलेल्या पैलवानांनी नंतर संयुक्तपणे खेळण्याचा विचार करण्यासारखं काहीतरी चाललं आहे. एकतर कुस्ती अशी युती करून खेळता येत नाही. त्यासाठी स्वतःतच दम, स्वतःची मेहनत असावी लागते. गंमत म्हणजे, या दोघांनीही आतापर्यंत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा वारसा सांगत जनतेचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी रक्ताच्या नात्याच्या, अस्सलतेच्या गोष्टीही केल्या आहेत. राजकारणात लोक रक्ताचं नातं गृहीत धरतात. आपल्या स्वर्गीय नेत्याबाबत असलेल्या प्रेमापोटी त्यांना पाठिंबाही देतात. पण, जेव्हा त्यांना वारसदारांच्या राजकारणात, कार्यपद्धतीत आपल्या प्राणप्रिय नेत्याच्या खुणा औषधालाही दिसत नाहीत, तेव्हा ते त्यांच्यापासून दूर होतात. स्वर्गीय नेत्याच्या धाटणीचा नवा नेता, नवं राजकारण शोधतात. उबाठा गट आणि मनसे या दोन्हींबाबत नेमकं हेच झालं आहे. शिवसैनिकांनी त्यांना पाठिंबा दिला नाही असं नाही. भरभरून पाठिंबा दिला. आशेने त्यांच्याकडून शिवसेनाप्रमुखांच्या जाज्वल्य राजकारणाची वाटही पाहिली. पण, जेव्हा त्यांनी आपल्याच मिजाशीत शिवसैनिकांना साधी ओळख देणंही टाळायला सुरुवात केली, निष्ठावंतांच्या टिंगलटवाळ्या सुरू केल्या, तेव्हा शिवसैनिक दुखावला. तो क्रमाक्रमाने त्यांच्यापासून दूर गेला. जो भावनिक नात्याने काल-परवापर्यंत उदासीन का होईना, थांबला होता; तोही गेल्या वर्षभरात वेगाने दूर झाला. दोन्ही बंधूंच्या भाषा आणि केवळ आपल्या राजकारणाच्या संकुचित सोयी बघण्याच्या पावित्र्याने आज आहे, तोही उद्या असेल की नाही याविषयी शंकाच आहे. कार्यकर्तेच सोबत नसलेल्या, चार-दोन डोक्यांत रमलेल्यांचं राजकारण त्यांनी किती बढाया मारल्या, तरी किती आणि कसं टिकणार? हा प्रश्न आहे.भाजपच्या पाठीत खंजीर खुपसून त्यांचा विश्वासघात केल्यानंतर उबाठाने केवळ सत्तेसाठी काँग्रेसच्या गोटात शिरकाव केला. शिवसेनाप्रमुखांनी आयुष्यभर दिलेल्या लढ्याला आणि मांडलेल्या विचारांना तिलांजली दिली. मनसेने असा अधिकृत घरोबा केला नसला, तरी आपल्या राजकीय भूमिका दर निवडणुकीला आणि दोन निवडणुकांच्या मधल्या काळात बदलण्याचा रेकॉर्ड केला आहे. मनसैनिकांनाही त्याबाबत कोडंच आहे. तेही नेहमी गोंधळलेलेच असतात. बंधूंच्या एकत्र येण्याची खात्री दोन्हींकडून यावेळी कितीही दिली जात असली, तरी शेवटी काय होईल याचा ठाम अंदाज एकही मनसैनिक देऊ शकत नाही ते त्यामुळेच. आपल्या मनस्वी नेत्याच्या पावलांकडे पाहत राहायचं, ती कुठे वळतात याचा अंदाज घेणंच तेवढं त्यांच्या हाती असतं. माजी गृहराज्यमंत्री बाळा नांदगावकर हे राज ठाकरे यांचे एकनिष्ठ एकलव्य. पण, त्यांचीही त्यामुळे माध्यमांसमोर बोलताना नेहमी गोची होते. ते कोणत्याच गोष्टीशी निश्चित हमी देऊ शकत नाहीत. 'आमचे पक्षप्रमुखच त्याबाबत निर्णय घेतील' असं सांगून ते स्वतःची सुटका करून घेत असतात. मावशीला भेटण्याचं निमित्त करून 'शिवतीर्था'वर गेलेल्या भाच्याच्या भेटीनंतर नांदगावकर यांनी माध्यमांसमोर केलेली वक्तव्यं त्यामुळेच जशी मोघम आहेत, तशीच त्यांची कसरत उघड करणारीही आहेत.' उबाठा आणि मनसे या दोन पक्षांच्या विचारसरणीत फरक आहे' असं विधान अन्यथा त्यांनी केलं नसतं. 'विचार करण्याच्या पद्धतीत फरक आहे' असं ते म्हणाले असते, तर ते ठीक होतं. पण, जे पक्ष सतत शिवसेनाप्रमुखांची विचारसरणी आणि संस्कारांबाबत बोलतात, त्यांची विचारसरणी वेगवेगळी कशी असू शकते? हा प्रश्न कायम राहतो.' या युतीसाठी उबाठाचा विशेष आग्रह असून ते युती घडवून आणण्यासाठी कोणत्याही गोष्टीला तयार होतील' असंही नांदगावकर माध्यमांसमोर बोलले आहेत. म्हणजे, खरी भीती कोणाला आहे आणि आपलं वस्त्रहरण रोखण्यासाठी दोघांपैकी कोणाची जास्त घाई आहे हे नांदगावकर यांनीच उघड केलं, हे बरं झालं. या दोघांनाही मुंबई, नाशिक, ठाणे, आणि पुणे या चार मोठ्या शहरांतच रस आहे. बाकी ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांनी निर्णय करावा अशी भूमिका असल्याचंही नांदगावकर यांनी सांगितलं. म्हणजे, मोक्याच्या चार मोठ्या ठिकाणी कार्यकर्त्यांच्या म्हणण्याला काही किंमत नाही! आणि त्यांच्यादृष्टीने इतर चिल्लर ठिकाणी कार्यकर्त्यांनी आपापल्या सोयीने निर्णय करावेत नि परवानगी घ्यावी, असा याचा अर्थ. याधोरणाचा अर्थही बराच खोल आहे. त्यावर स्वतंत्रपणे लिहिता येईल!मनसेसाठी उबाठा महाविकास आघाडीची साथ सोडणार का? हा प्रश्नही असाच खोल आहे. कारण यांच्या भेटीसाठी जशा वाढल्या, तशी काँग्रेसच्या नेत्यांनी दोन दिवसांपूर्वीच उबाठाची भेट घेतली. मनसेला सोबत घेणं काँग्रेससाठी अडचणीचंच ठरणार आहे. 'मविआची आणि आमची विचारसरणी वेगळी आहे', हेही नांदगावकर यांनी स्पष्ट केलं आहे. मविआ सोडायला उबाठाची हरकत नाही. फक्त ते समजून उमजून करावं आणि राष्ट्रवादी शप गटाला बरोबर ठेवावं, असा त्यांचा विचार आहे. तो मनसेसाठी अवघड आहे. आघाडीचा तिढा आणि मग जागावाटपाचा गुंता वाटतो तितका सोपा नाही. त्याची जाण सामान्य कार्यकर्त्यांना आहे. त्यामुळेच अगदी मोजकेच बोलताहेत, बाकी सारे शांत आहेत. जे उत्साह दाखवताहेत, त्यांचा भ्रमनिरास अटळ आहे!!

# गेवराई येथे वंचितच्या जन आक्रोश महामोर्चाने प्रशासनाची उडाली झोप

## मागण्या मान्य करून घेण्यासाठी हजारोचा समुदाय रस्त्यावर

**गेवराई । प्रतिनिधी**

शोषित पीडित वंचितांच्या विविध प्रश्नांचा निपटारा करण्याच्या हेतूने गेवराई तालुका वंचित बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्यावतीने तालुका अध्यक्ष पप्पु गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तहसीलवर जन आक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. आंदोलनात मोठा जनसमुदाय पाहून प्रशासनाला घाम फुटला मागण्यात तात्काळ या लवकर मान्य न झाल्यास पुन्हा रस्त्यावर उतरून मोठे जन आंदोलन करण्यात येईल अशे यावेळी जनसामान्यांचे नेतृत्व पप्पू गायकवाड यांनी रोख ठोक मेक ठोकून प्रशासनाच्या नाकात दम आणला. यावेळी मोठा जन समुदाय या मोर्चात सहभागी झाल्याने प्रशासन हवालदिल झाले होते.

यावेळी वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र राज्य महासचीव प्रा.किसन चव्हाण म्हणाले की पंडीत,पवार केवळ दलित, मुस्लिम, ओबीसी, आदिवासी यांचे मते घेण्यासाठी वाडी-वस्ती तांड्यावर, पाड्यावर येतात परंतु या लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी फक्त वंचित बहुजन आघाडी



**जोपर्यंत प्रशासकिय अधिकारी आंदोलन स्थळी येवुन लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत जागचे हलनार नाही अशी भुमिका घेतल्यावर तहसिलदार खोमने यांनी बैठक आटपती घेत ना.तहसिलदार यांच्यापाशी लेखी पत्रक देऊन तहसिल संबंधित कामे एका महिन्यात मार्गी लावु असे लेखी आश्वासन दिले,लगेचच गेवराई पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी पंचायत समिती अंतर्गत येणारे मागण्यातील सर्व प्रश्न मार्गी लावु असे आश्वासन दिल्यानंतर जनाक्रोश आंदोलन मागे घेण्यात आले.**

व वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आंदोलन, मोर्चा काढू मार्गी लावतात त्यामुळे जणतेने देखील पुढील काळात जो आपले प्रश्न मार्गी लावतो,जो आपल्या आडचनीवेळी खंबीरपणे सोबत राहतो त्याच वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना मते दिली पाहिजेत.

जन सुरक्षा विधेयक तात्काळ रद्द करण्यात यावे, गायरान जमीन सातबारा लावून देणे, गावठाण जमिनीवरील अतिक्रमण कायमचे करून पीटर देणे, घरकुलधारकाकडून सरपंच ग्रामसेवक यांच्याकडून होत असलेली पैशाची मागणी तात्काळ बंद करण्यात यावी, विधवा निराधार यांच्या पगारी पूर्वत करून रखडलेले अर्ज तात्काळ मार्गी लावण्यात यावेत या विविध मागण्यांकरिता वंचित बहुजन आघाडी महाराष्ट्र राज्य महासचिव तथा बीड जिल्हा प्रभारी किसन चव्हाण व बीड जिल्हा अध्यक्ष अजय सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली पप्पू गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली गेवराई तहसीलवर भव्य अशा जन आक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्र राज्य तक्रार निवारण समितीचे अध्यक्ष तथा बीड लोकसभा २०१९ चे उमेदवार प्रा.विष्णु जाधव,धम्माभाऊ साळवे ,खंडु जाधव, राजेंद्र पोकळे, सुदेश पोदार, संदीप रोकडे, किरण वाघमारे,सचिन मेघडंबर, बाळासाहेब गायकवाड, किशोर भोले,रेवन गायकवाड, ज्ञानेश्वर हवाले .

# जिल्हास्तरीय युवा महोत्सवात तुलसी महाविद्यालयाची विजयी कामगिरी; सात स्पर्धांमध्ये सात बक्षिसे

## आवडत्या क्षेत्रात करिअर साधण्यासाठी धैर्य, प्रामाणिक मेहनत आणि पाय जमिनीवर ठेवणे आवश्यक-प्रा.प्रदीप रोडे

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या क्षेत्रात करिअर साधण्यासाठी धैर्य, प्रामाणिक मेहनत आणि पाय जमिनीवर ठेवणे आवश्यक आहे. यश आणि अपयश क्षणभुंगर असतात, परंतु सातत्यपूर्ण प्रयत्न आणि मेहनत हाच यश मिळवण्याचा मार्ग आहे, असे प्रतिपादन देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांनी केले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने ११ व १२ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या बीड जिल्हास्तरीय युवा महोत्सवात तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीडच्या संघाने नाट्यकला, संगीत, नृत्य, वाद्यप्रस्तुती, वक्तृत्व, चित्रकला आणि आत्मकथन अशा सात प्रमुख स्पर्धांमध्ये आपले वर्चस्व प्राप्त केले.या यशस्वी कामगिरीसाठी शनिवारी महाविद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. प्रदीप रोडे उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल, डॉ.



सुनील जोंधळे, प्राचार्य डी. डी. राऊत, प्रा. नितीन काळे, मा. अशोक तावरे, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे आदी उपस्थित होते.

एकांकिकेच्या स्पर्धेत आदित्य ठोंबरे यांनी प्रथम पारितोषिक मिळवले, तर ऋतुजा वाघमारे हिने बेस्ट ॲक्ट्रेसचा मान प्राप्त केला, तर रोहित गव्हाणे यांनी बेस्ट ॲक्टिंग, उत्कृष्ट दिग्दर्शन आणि सर्वोत्तम संघगौरवाचे बक्षिस मिळवले. याशिवाय, रोहित गव्हाणे यांच्या टीमने मिमिक्री स्पर्धेत तिसरे स्थान मिळवले, तर शैला माने यांच्या टीमने रांगोळी स्पर्धेत तिसरे बक्षिस पटकावले.प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले, त्यांच्या अथक परिश्रमाचे कौतुक केले आणि भविष्यातही अशा सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सतत सक्रिय राहण्याचे आवाहन केले. डॉ.गजानन खेत्री, प्रा.पाठक प्राची यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी अथक मेहनत व तयारी करून या यशाची प्राप्ती केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. योगिता लांडगे यांनी केले, तर आभार प्रा. पल्लवी जगताप यांनी मानले.

# मराठा समाजाला आजपर्यंत आरक्षण मिळाले नाही हि सल मनात ठेऊन तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील होळ येथील श्री वैभव उर्फ गणेश बालासाहेब शिंदे वय वर्षे २५ यांनी दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री सात वाजण्याच्या सुमारास झाडाला दोरी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.



याविषयी मिळालेली माहिती अशी की,होळ गावात नागरिकांमध्ये अशी चर्चा ऐकावयास मिळाली की,श्री वैभव उर्फ गणेश बाळासाहेब शिंदे हे मराठा आरक्षणा संदर्भात बऱ्याच वेळेस अंतरवाली व मुंबई येथे गेले होते.व आरक्षण मिळाले म्हणून मुंबई येथून सर्वजन आनंदाने परत आली मात्र आल्या नंतर जिकडे तिकडे ओबीसी समाजाने हि मराठा आरक्षणाला विरोध म्हणून जिकडे तिकडे मोर्चा काढून निषेध करत आहेत हिच सल मनात ठेऊन आता आता मराठा समाजाला आरक्षण मिळते कि नाही म्हणून संतापाने शेतात जाऊन एका झाडाला दोरी बांधून गळफास घेऊन आत्मा केले आत्महत्या केलेली घटना दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री सात वाजता घडली आहे.स्व.वैभव याच्या पार्थीवावर मोजे होळ येथे दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी अंतसंस्कार करण्यात आले.यावेळी होळ पंचक्रोशीतील नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.स्वर्गीय वैभव यांच्या पश्चात पत्नी दिपाली व एक मुलगा राजवीर व आई वडील असा परिवार आहे.

# प्रा.हाके यांचे राहुल प्रतिष्ठान शिक्षक कॉलनी येथे मित्र परिवाराकडून स्वागत



**केज । प्रतिनिधी**

राहुल प्रतिष्ठान, शिक्षक कॉलनी, केज येथे प्रा. लक्ष्मण हाके यांचे जंगी स्वागत करण्यात आले. या प्रसंगी मित्र परिवारातील मान्यवर उपस्थित होते.प्रा. हाके यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचा गौरव करत मित्रपरिवाराने त्यांचा सत्कार केला. यावेळी विविध मान्यवरांनी शुभेच्छा देत पुढील कार्यासाठी प्रोत्साहनपर शब्द व्यक्त केले.

# जि.प.माध्य.शाळा मस्साजोगच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत घवघवीत यश

**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळा मस्साजोग येथील विद्यार्थ्यांनी तालुका स्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत चमकदार कामगिरी करीत घवघवीत यश संपादन केले.या यशानंतर आयोजित कार्यक्रमास तालुका क्रीडा अधिकारी श्री. एम. यादव मॅडम, तालुका क्रीडा संयोजक श्री. बरडे सर, गिरी सर, श्रीमती आचार्य मॅडम, नगरगोजे सर, मुख्याध्यापक श्रीमती व. व. सोनार मॅडम, शिंदे सर, इंगोले सर, मुख्याध्यापक श्री. कोथिंबीरे सर, स्वामी विवेकानंद शाळेचे घुगे सर तसेच इतर मान्यवर व शिक्षकवृंद उपस्थित होते.विद्यार्थ्यांच्या या उत्कृष्ट यशाबद्दल सर्व मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थीदेखील क्रीडा क्षेत्रात उत्तुंग झेप घेत असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.



# जळगाव येथे खांन्देश विभागीय तिसरी मिटिंग होणार!

**परळी । प्रतिनिधी**

रिपब्लिकन सन्मान सभा एक सामाजिक दूरदर्शी नेतृत्वाचा मार्ग ...! ) एक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, पत्रकारिता, क्रीडा, या क्षेत्रात कार्य करण्यासाठी एक नवे संघटन बांधणी आणि त्याची राज्यात बांधणी गेल्या वर्षापासून सुरू झालेली आहे. यापुर्वी पहिली बैठक मे महिन्यात मराठवाडा विभागीय छत्रपती संभाजी नगर येथे झाल्यांनंतर बैठकीत ठरविण्यात आले की, यानंतर विदर्भ विभागीय कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल. त्यादृष्टीकोणातून दुसरी बैठक ऑगस्ट महिन्यात विदर्भ विभागीय बैठक घेऊन विदर्भ विभागीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. दोन्हीही विभागांचे वरिष्ठ पदाधिकारी सुद्धा सभासद उपस्थित होते. विदर्भ विभागीय पुढील बैठकीची रूपरेषा ठरविण्यात आली. आता रिपब्लिकन सन्मान संघाच्यावतीने जळगाव येथे खांन्देश विभागीय विभागात तिसऱ्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



रिपब्लिकन सन्मान सभेचे राष्ट्रीय समन्वयक – प्रा.डॉ. दशरथ वैजनाथ रोडे यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण राज्यातील सहा विभागीय आणि विविध जिल्ह्यांमध्ये संघटन उभा करण्याचे सामाजिक बांधणी चालू आहे. राज्यातील जिल्हा कार्यकारणी बांधणी, तत्त्व, ध्येय आणि धोरण आणि संघटनेचे बांधणी या विषयावर चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले जाईल. राज्यात रिपब्लिकन सन्मान सभेचे पहिला टप्प्यात मराठवाडा, औरंगाबाद येथे व्यापक विभागीय कार्यकारिणी बैठकीत संघटन विस्तार चर्चा , बांधणी, धोरण , उद्देश अन्य विषयांवर चर्चा करण्यात आली होती. दुसऱ्या टप्प्यात विदर्भ विभागीय कार्यकारिणी सदस्य नव्याने कठोर परिश्रम योगदान घ्यावीत असे आव्हान करण्यात आले आणि तिसरा टप्पा खान्देश विभागीय बैठकीचे जळगाव जिल्ह्यात नियोजन सुरू आहे. महाराष्ट्रात रिपब्लिकन सन्मान सभेला एक नवे संघटन.! एक नव्या सामाजिक संघटना, नवी उर्जा घेऊन संपूर्ण विभागीय बैठकांचे घेण्यात येत आहेत. मराठवाडा, विदर्भ विभागीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यापुढे जळगाव येथे खान्देश विभागाची तिसऱ्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या विभागीय बैठकीसाठी मराठवाडा विभाग, आणि विदर्भ विभागाचे संपूर्ण कार्यकारिणी चे सभासद उपस्थित आवर्जून राहणार आहेत. राष्ट्रीय समन्वयक प्रा डॉ दशरथ वैजनाथ रोडे यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे झालेल्या बैठकीत आता औपचारिक बैठक घेऊन विदर्भ विभागीय कार्यकारिणी घोषित करण्यात आली. जळगाव येथे खांदेश विभागीय व्यापकता, दुरदृष्टी, नियोजन, बांधणी, सभासद नोंदणी वाढविणे, संघटनेची जबाबदारी, संघटनेचे ध्येय आणि धोरणे रचनात्मक अभ्यासपुर्ण भविष्यात स्वरूपात बैठक होईल अशी, अपेक्षित स्थानिक सदस्य. विजय कुमार यांनी विश्वास व्यक्त केला. खांन्देश विभागात विविध जिल्ह्यांमध्ये सामाजिक संघटन आणि त्याची बांधणी जिल्ह्यामध्ये आणि तालुका स्तरावर कार्यकारणीची बांधणी करून जिल्ह्याच्या ठिकाणी सभासदांचा सभासद नोंदणी सुरू करण्याची मोहिम राबविण्यात येणार आहे. रिपब्लिकन सन्मान सभाची फुले, शाहू, डॉ.आंबेडकर यांच्या विचारांची जनजागृती करत मुंबईच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. मुंबईत राज्य कार्यकारिणीची जय्यत तयारी होणार आहे. प्रा.डॉ. दशरथ वैजनाथ रोडे ( मुख्य संपादक जन सन्मान तथा दैनिक परळी सन्मान, आणि राष्ट्रीय समन्वयक – रिपब्लिकन सन्मान संघाच्यावतीने जळगाव येथे खांन्देश विभागीय तिसऱ्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. यापुर्वी पहिली बैठक मे महिन्यात मराठवाडा विभागीय छत्रपती संभाजी नगर येथे झाल्यांनंतर बैठकीत ठरविण्यात आले की, यानंतर विदर्भ विभागीय कार्यकारिणी जाहीर करण्यात येईल. त्यादृष्टीने कोणातून दुसरी बैठक ऑगस्ट महिन्यात विदर्भ विभागीय बैठक घेऊन विदर्भ विभागीय कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. दोन्हीही विभागांचे वरिष्ठ पदाधिकारी सुद्धा सभासद उपस्थित होते. विदर्भ विभागीय पुढील बैठकीची रूपरेषा ठरविण्यात आली आता जळगाव येथे ऑक्टोबर महिन्यात तिसरी खांन्देश विभाग बैठक घेण्याचा सर्वानुमते ठराव व निर्णय घेण्यात आला.

मुंबई, कोकण, पश्चिम, खान्देश विभागीय अध्यक्ष, कार्याध्यक्ष, सचिव, सहसचिव, संघटक, सल्लागार, प्रसिद्ध प्रमुख यांची कार्यकारिणीची बैठकीत विभागीय कार्यकारिणी जाहीर करण्यात येणार आहे.

# शिक्षण मंत्री यांनी अनौपचारिक गप्पांद्वारे शिक्षण विषयक प्रश्नांवर शिक्षण तज्ञांशी साधला सुसंवाद

**मुंबई । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण मंत्री मा. दादाजी भुसे यांनी दिनांक ०९ सप्टेंबर २०२५ रोजी राज्यातील शिक्षण तज्ञांशी अनौपचारिक गप्पांद्वारे मनमोकळा संवाद साधला आणि विविध शिक्षण विषयक प्रश्नांवर राज्यातील शिक्षण तज्ञांची भूमिका जाणून घेतली, महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि काळानुरूप व्हावी यासाठी राज्यातील शिक्षण अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ,भाषातज्ज्ञ यांचेशी माननीय शिक्षणमंत्री नामदार दादाजी भुसे यांनी अनौपचारिक गप्पांद्वारे सुसंवाद साधला. या गप्पांचा विषय होता शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा या चर्चेत प्रसिद्ध दिग्दर्शक–अभिनेते मंगेश देसाई, शिक्षण अभ्यासक हेरंब कुलकर्णी, प्रतिभा भराडे, प्रवीण काळम पाटील, संदीप वाकचौरे, शिक्षण विकास मंचचे समन्वयक माधव सूर्यवंशी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या डॉ. गीता शिंदे तसेच प्रा. डॉ. राजेश बनकर आदी मान्यवर सहभागी झाले होते. खासदार संदीपनजी भुमरे ही यावेळी उपस्थित होते, त्यांनीही मौलिक सूचना मांडत शैक्षणिक पायाभूत सुविधा आणि ग्रामीण शाळांच्या समस्या यावर भर देण्याची गरज अधोरेखित केली. बैठकीदरम्यान शिक्षक–विद्यार्थी संबंध, अध्यापनातील सर्जनशीलता, नाट्यकलेद्वारे शिक्षण प्रभावी करण्याचे मार्ग, भाषाशिक्षण, मातृभाषेचे महत्त्व, डिजिटल साधनांचा वापर, तसेच ग्रामीण–शहरी शैक्षणिक दरी कमी करण्याच्या उपाययोजना यावर सखोल चर्चा झाली. तज्ज्ञांनी शिक्षणातील नवनवीन प्रयोग आणि जागतिक दर्जाचे मानदंड गाठण्यासाठी धोरणात्मक बदलांची गरज व्यक्त केली.शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी सर्व मान्यवरांची भूमिका समजून घेतली आणि पुढील काळात अशा चर्चांचा विस्तार करून त्यातून आलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचा मनोदय व्यक्त केला . महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण , दर्जेदार आणि रोजगाराभिमुख शिक्षण मिळावे यासाठी समाजातील विविध घटकांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असे ते म्हणाले.या वेळी शिक्षणमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणी, प्रत्येक विद्यार्थ्यासाठी हेल्थ कार्ड विकसित केले जाणार आहे.



तसेच आनंददायी शनिवार या संकल्पने अंतर्गत राष्ट्रभक्तीपर संगीतमय कवायत, क्रीडा व सैनिकी शिक्षण , याशिवाय शिक्षकांसाठी कला–कीडा स्पर्धा या विषयांवर प्रकाश टाकला,अध्ययन अध्यापनासोबतच सांस्कृतिक व कलात्मक सहभाग वाढविण्याची गरज व्यक्त केली. बैठकीतून शिक्षक प्रशिक्षण,अभ्यासक्रम समृद्धी, सांस्कृतिक दृष्टिकोनातून शिक्षणाची उन्नती आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे यासंदर्भात सूचना पुढे आल्याने आगामी काळात ठोस निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होईल,आणि पुढील वर्षी राज्यातील शैक्षणिक गुणवत्तेचे चित्र पूर्वी पेक्षाही उत्तम असेल, असा आशावाद व्यक्त केला.

# लातूरमधील आत्महत्येची घटना दु:खद:ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, कुणीही टोकाचे पाऊल उचलू नये-अजित पवार



**मुंबई (वृत्तसंस्था)**–ओबीसी आरक्षणाच्या चिंतेतून लातूर जिल्ह्यातील वांगदरी (ता. रेणापूर) येथील भरत महादेवराव कराड यांनी केलेल्या आत्महत्येबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ही घटना 'अत्यंत दुःखद आणि मन हेलावणारी' असल्याचे सांगत, त्यांनी कराड यांच्या आत्म्याला श्रद्धांजली अर्पण केली. मराठा समाजाला आरक्षणाचा हक्क देतांना कोणत्याही परिस्थितीत ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही, याची आम्ही पूर्ण खबरदारी घेत आहोत. त्यामुळे या संवेदनशील काळात कुणीही टोकाची भूमिका घेऊ नये, अशी विनंती अजित पवार यांनी केली आहे.

मराठा आंदोलन मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासंदर्भातील जीआर देखील काढण्यात आला आहे. यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र मिळणे सोपे झाले असून, त्यांना ओबीसीतून आरक्षणाचा लाभ घेता येणार आहे. मात्र, हैदराबाद गॅझेटच्या जीआरवरून ओबीसी समाजात तीव्र नाराजी पसरली आहे. मराठा आरक्षणामुळे ओबीसींचे आरक्षण संपुष्टात येत असल्याच्या निषेधार्थ लातूरच्या रेणापूर तालुक्यातील वागदरी येथील भरत महादेव कराड नामक एका ३५ वर्षीय तरुणाने मांजरा नदीपात्रात उडी मारून आत्महत्या केली. अजित पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत भरत कराड याला श्रद्धांजली अर्पण केली.

# राज्यात पावसाचा जोर वाढणार

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**– बंगालच्या उपसागराच्या वायव्य भागात पुन्हा एकदा कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याची नोंद हवामान विभागाने केली आहे. या प्रणालीमुळे आंध्र प्रदेश, ओडिशा तसेच महाराष्ट्राच्या विविध भागांत पावसाची तीव्रता वाढण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून मराठवाडा आणि विदर्भ या भागांत दाट ढगाळ वातावरण असून अधूनमधून सरी कोसळताना दिसत आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, कारण खरीप हंगामातील पिकांना आवश्यक असा ओलावा लाभतो आहे. मात्र काही भागात अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होण्याची शक्यता



हवामानतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. या बदलत्या वातावरणामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे.पुढील चार दिवसांत राज्यात पावसाचा जोर वाढणार असल्याचे खात्रीशीर संकेत हवामान खात्याने दिले आहेत. १२ आणि १३ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. परभणी, हिंगोली, बीड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यांसह संभाजीनगर आणि जालना परिसरात ढगफुटी स्वरूपाचा पाऊस होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. यामुळे नदी–नाल्यांना पूर येण्याची शक्यता असून प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सतर्क ठेवण्यास सुरुवात केली आहे. शेतकऱ्यांनी या काळात पिकांच्या शेतात अनावश्यक पाणी साचू देऊ नये आणि पावसाच्या संततधारांमध्ये शेतात न जाण्याचा सल्ला दिला आहे. ग्रामीण भागात पावसाच्या थैमानामुळे वीजपुरवठा खंडित होण्याचीही शक्यता व्यक्त होत आहे.

# शेगावात मुसळधार पावसाने ग्राम पंचायतीच्या भ्रष्टाचाराचा पर्दाफाश

## दुकानदारांचे मोठे नुकसान, घराघरांत पाणी शिरले

**शेगाव । प्रतिनिधी**

दिनांक १२ सप्टेंबर रोजी दुपारी चारच्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसाने वरोरा तालुक्यातील शेगाव (बू) ग्रामपंचायतीच्या निष्काळजी कारभाराची पोलखोल केली. नालेसफाई न झाल्यामुळे आणि अयोग्य नियोजनामुळे गावकरी व दुकानदारांना प्रचंड फटका बसला.



सरपंच व तथाकथित अघोषित सरपंच यांच्या नावाखाली विकासाच्या गप्पा झोडल्या जात असल्या, तरी प्रत्यक्षात सुरू असलेल्या भ्रष्टाचाराचा भार सामान्य जनतेवर कोसळत असल्याचे स्पष्ट झाले. नालीसफाईच्या नावाखाली केवळ कागदोपत्री बिलं काढली जातात, थातूरमातूर साफसफाई केली जाते आणि त्यातून बाहेर पडणारा मळ न उचलताच सोडून दिला जातो, असा संतप्त आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

यात भर म्हणून काँग्रेस रोडलगत बांधलेल्या नॅशनल हायवेच्या नाल्या क्षमतेला न जुमानता बांधल्याने पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण झाला. जुन्या नाल्यांमधून येणारे पाणी आणि नव्या रोडच्या नाल्यांतील अडथळे यामुळे गावातील बाजारपेठ जलमय झाली. व्यापाऱ्यांच्या दुकानात पाणी शिरून मोठे आर्थिक नुकसान झाले, तर नागरिकांच्या घरांनाही पुराचा फटका बसला.स्थानिकांचा आरोप आहे की, ग्रामपंचायत विकासाचे फुगे फुगवत असली तरी साध्या नालेसफाईसारख्या मूलभूत कामातही गंभीर निष्काळजीपणा करत आहे. भ्रष्टाचाराच्या दलदलीत बुडालेल्या या कामकाजाचा फटका आता थेट गावकऱ्यांच्या जीवितास व संपत्तीला बसत आहे.

# तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत राजाभाऊ तळेकर विद्यालयाच्या समृद्धी तळेकरचे यश




**सोलापूर । प्रतिनिधी**

क्रीडा युवक व सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा परिषद सोलापूर व पंचायत समिती करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय कुस्ती स्पर्धेत राजाभाऊ तळेकर विद्यालयाच्या समृद्धी सचिन तळेकर (इयत्ता आठवी) हिने ४६ किलो वजनी गटात मॅटवरील कुस्ती प्रकारात तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला. या यशामुळे तिला पुढील जिल्ह्यास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळाली.

पंचायत समिती करमाळा यांच्या वतीने तिला मेडल देऊन सन्मानित करण्यात आले, तसेच विद्यालयाच्या वतीनेही समृद्धीला गौरवण्यात आले. तिच्या या यशामागे पैलवान मदन (तात्या) तळेकर व वडील सचिन (बापू) तळेकर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.

समृद्धीच्या या यशाबद्दल केम परिसरात कौतुकाचा वर्षाव होत असून, संस्थेचे चेअरमन महेश तळेकर, सचिव व राजाभाऊ तळेकर विद्यालयाचे मुख्याध्यापक मनोज तळेकर, शिवाजी प्राथमिक विद्यामंदिराचे मुख्याध्यापक नागनाथ तळेकर, सर्व पदाधिकारी, क्रीडाशिक्षक बाळासाहेब सोनवणे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी समृद्धीचे अभिनंदन केले.

# बालेवाडी येथिल मूक्ताई नगर रस्ता डांबरीकरण



**पुणे । प्रतिनिधी**

बालाव्डी येथिल मूक्ताईनगर रस्ता डाबरीकरण कथक प्रयत्ना नंतर माजी नगरसेवक बाबूराव चादेरे आणि राहूल बालवडकर यांच्या प्रयत्नामूळे डांबरिकरण पूर्ण झाले यामूळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे

बालेवाडी परिसरातिल मुक्ताईनगर मध्ये अनेक वर्षापासून जनतेला खड्डे , चिखल आणि धुळीचा सामना करावा लागत होता खराब रस्त्यामूळे जेष्ठ नागरीक , शाळेतील विद्यार्थी , कामगार आणि येथिल सोसायटील नागरीकांना वाहन चालवतांना त्रास सहन करावा लागत होता या रस्त्याबाबत अनेकांनी महापालिकेकडे तक्रारी करूनही या रोडची बाबत कोणतीही कारवाई केली गात नव्हती सतत जनतेला अडचणीचा सामना करावा लागत होता या समस्ये बाबत तोडगा काढण्या साठी माजी नगरसेवक आणि माजी स्थायी समितीचे अध्यक्ष बाबूराव चांदेरे तसेच पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रासचे उपाध्यक्ष राहुल बालवडकर यांनी पुढाकार घेत यांच्या प्रयत्नांतून आणि नागरिकांच्या सहकार्याने हा रस्ता डांबरीकरण करून दर्जेदार नव्याने करून डांबरकरण करण्यात आला याचा फायदा येथिल नागरीकासह विद्यार्थी , कामगार आणि दूकानदारांना तसेच जेष्ठांना होईल.

# पनवेल वावंजे रस्त्याची दयनीय अवस्था कंबर आणि मान आजाराने नागरिक त्रस्त

## माजी नगरसेविका प्रज्योती म्हात्रे यांची आक्रमक भूमिका

**पनवेल । प्रतिनिधी**

करोडो रुपये खर्चून बनविण्यात आलेला पनवेल वावंजे रस्ता खड्यात गेला असून त्याची अवस्था बिकट आहे. पूर्ण रस्ता पाण्याखाली जात असल्याने वाहन चालकांना तारेवरची कसरत करावी लागत असून रस्त्यांचा अंदाज येत नसल्याने अपघातात जीव गमावण्याची वेळ येत आहे. या रस्त्यावरून येजा करणारे नागरिक मान दुखी आणि कंबर दुखणे त्रस्त आहेत. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी माजी नगरसेविका प्रज्योती म्हात्रे यांनी कंबर कसली आहे. यंदाच्या पावसाळ्यात पनवेल– वलप रस्त्याची अवस्था कधी–नव्हे इतक्या वाईट झाली आहे की या रस्त्यावरून प्रवास करणे म्हणजे अपघाताला आमंत्रण दिल्या सारखे आहे.रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता हे ओळखणे कठीण झाले आहे. टेंभोडे बसस्टॉप समोर तसेच गणेशनगर वलपच्या समोर रस्ता इतका खराब झाला आहे की तीकडे रिक्शावालेही फीरकायला तयार नाहीत .तळोजा एम.आय.डी.सी.ला शॉर्टकट म्हणून अनेक कामगार या रस्त्याचा वापर करतात.परंतु गेल्या काही दिवसांपासून रस्त्याची दुर्दशा पाहून कामगार आणि नागरिक हैराण झाले आहेत.स्थानिक नगरसेविका प्रज्योती म्हात्रे यांच्या पाठपुराव्यामुळे या रस्त्याला चांगले दिवस येणार असल्याचे भाष्य त्यानी बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी झालेल्या बैठकीनंतर केले. यापूर्वी ऑगस्ट महिन्यात सुद्धा पत्रव्यवहार करून जनतेची कैफियत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनकडे मांडली होती.पण काल त्यांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे अधिकाऱ्यांनी खराब रस्त्याचे काँक्रिटीकरण करण्याचे मान्य केले आहे.तसेच ते येत्या आठ दिवसांत कामाला सुरुवात करणार आहेत. या बैठकीला प्रज्योती म्हात्रे यांच्या सह शेकाप जिल्हा महानगर चिटणीस प्रकाश म्हात्रे,शेकाप नेते ज्ञानेश्वर मोरे तसेच पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



# अल्पवयीन मुलीचे अपहरण करणाऱ्या तरुणाला घेतले तेलंगणा राज्यातून ताब्यात

## अपहरण झाल्याच्या नैराश्यातून वडिलांनी केला होता आत्महत्येचा प्रयत्न

**केज । गौतम बचुटे**

वीस वर्षीय तरुणाने एका १६ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचे अपहरण करून थेट तेलंगणा राज्य गाठले आणि पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने तपास करून मुलीसह आरोपीला तेलंगणा राज्यातून ताब्यात घेतले आहे.केज तालुक्यातील काशिदवाडी येथून दि.३० मे रोजी रात्री जेवण करून एकत्र झोपल्या नंतर एका कुटुंबातील अंबाजोगाई येथे १२ वी च्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या १६ वर्ष वयाच्या मुलीचे दि. ३१ मे रोजी रात्री अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी अपहरण केले होते. अपहृत मुलीच्या वडिलांच्या तक्रारी वरून केज पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरुद्ध अल्पवयीन मुलीचे अज्ञात कारणासाठी अपहरण केल्याचा गु. र. नं. २८३/२०२५ भा. न्या. सं. १३७(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.



या घटनेला तीन महिन्या पेक्षा जास्त कालावधी उलटून देखील त्या प्रकरणी संशयित आरोपींचा ठाव ठिकाणा लागत नव्हता.

या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम यांनी तपास करीत असताना संशयित अपहरणकर्ता हर्षद बालाजी जाधवर यांच्या वर लक्ष्य केंद्रित करून गुप्त पद्धतीने आणि तांत्रिक पद्धतीने तपास करून संशयिताच्या नातेवाईकांचे फोन कॉल व सीडीआर यांचा तपास केला असता आरोपींचे लोकेशन ही तेलंगणा राज्यात आढळून आले. त्या नंतर वरिष्ठांची परवानगी घेऊन पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम हे त्यांचे सहकारी पोलिस हेडकॉन्स्टेबल चंद्रकांत काळकुटे, पोलीस नाईक किशोर गोरे आणि महिला पोलिस कॉन्स्टेबल जयश्री भालेराव यांच्यासह तेलंगणाच्या दिशेने रवाना झाले. तेलंगणात पोहोचल्या नंतर स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्यांनी पत्ता शोधला. त्यावेळी संशयित हर्षद बालाजी जाधवर आणि ती अल्पवयीन मुलगी हे तेलंगणा राज्यातील खम्मम जिल्ह्यातील मोडीगोंडा येथे एका फरशीच्या कारखान्यात काम करीत असल्याची माहिती मिळाली. त्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेऊन केज पोलिस ठाण्यात आणले. त्या नंतर हर्षद जाधवर याच्यावर बलात्कार आणि पोक्सोचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याचा तपास आता पिंक पथकाचे पोलिस उपनिरीक्षक प्रकाश शेळके यांच्याकडे वर्ग करण्यात आला आहे.

### 'त्या' तरुणाला पोलिस कोठडी तर अल्पवयीन मुलगी सुधारगृहात

**आरोपी हर्षद जाधवर याला न्यायालयासमोर हजर केले असता त्याला १५ सप्टेंबर पर्यंत पोलिस कोठडी सुनावली असून पीडित मुलीची रवानगी सुधार गृहात करण्यात आली आहे.**

### मुलीच्या वडिलांनी केला होता आत्महत्येचा प्रयत्न

**मुलीच्या अपहरणाच्या नैराश्यातून मुलीच्या वडिलांनी दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी ३:०० च्या सुमारास विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता.**

## धर्मप्रसारक ह भ प मधुसूदन महाराज कापशीकरांची हिंदोळा ते ज्ञानमाता सरस्वती मंदिर बासर यात्रा

**लोहा । हनुमंत चंदनकर**

नांदेडच्या लोहा तालुक्यातील हिंदोळा मंदिर येथील भागवत धर्म प्रसारक ह भ प श्री मधुसूदन महाराज कापशीकर यांची वर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक १४ सप्टेंबर रोज सकाळी सात वाजता श्री क्षेत्र हिंदोळा ते श्रीक्षेत्र ज्ञानमाता मंदिर सरस्वती बासर यात्रेचे आयोजन करण्यात आला आहे मधुसूदन महाराज कापसी कर यांच्या समावेत हजारो भाविक यात्रेमध्ये सहभागी होणार आहेत मानवी कल्याणाच्या उद्देशाने अनेक जाती-धर्माला एकत्र घेऊन !!खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे!! जाऊक्तीप्रमाणे सर्वांना ज्ञान प्राप्त व्हावं हा उद्देश ठेवून या यात्रेचा आयोजन करण्यात आला आहे ज्या मार्गावरून ही यात्रा जाणार आहे ठिकठिकाणी यात्रेकरूंचं स्वागत स्वागत व प्रसादाची व्यवस्था केली जाणार आहे मारताळा येथील प्राचार्य बंडू पाटील संपत पाटील व यांच्या सहकाऱ्यांनी कडून महाराजांचे व यात्रेचे स्वागत केले जाणार आहे व प्रसाद व्यवस्था केली जाणार आहे तर घुंगराळ्यातील राष्ट्रवादीचे वसंत सुगावे पाटील यांच्याकडून यात्रेचे स्वागत व प्रसाद तसेच लोहगाव येथील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते तथा सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन श्री राजेंद्र तोटावाड रेड्डी यांच्यावतीने यात्रेचे स्वागत व प्रसादलाची व्यवस्था केली जाणार आहे तर येथील माजी जिल्हा परिषद सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड कासराळी येथे प्रवचन व स्वागत भव्य महाप्रसाद यात्रेची शोभायात्रा गोदावरी ते ज्ञानमाता सरस्वती मंदिर बासर येथे सरस्वती माते पुजा आरती करून सांगता होणार आहे . तरी भाविकांनी सहभागी व्हा असे आवाहन श्री ह भ प श्री मधुसूदन महाराज कापशीकर यांनी केले आहे.



## आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून घोटाणे गावातील शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**नंदुरबार । दिपक गोसावी**

राज्याचे माजी आदिवासी विकास मंत्री आणि नंदुरबार विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार, डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या कार्यशैलीवर आणि विकासात्मक दृष्टिकोनावर विश्वास ठेवून घोटाणे (तालुका नंदुरबार) गावातील शेकडो कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. यामध्ये शिवसेना (शिंदे गटा) चे माजी सरपंच सुभाष गोसावी, माजी उपसरपंच ब्रिजलाल धनगर, दशरथ भाया, सोसायटीचे चेअरमन राजू गोसावी यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

या जाहीर प्रवेशामुळे नंदुरबार तालुक्यात भाजपची ताकद आणखी वाढली आहे.



प्रवेश केलेल्यांमध्ये माजी ग्रामपंचायत सदस्य अण्णा बावा, देवपुरी गोसावी, मोतीलाल गोसावी, अनिल गोसावी, राजू गोसावी, कैलास गोसावी, उमेश गोसावी, वामन बावा, श्याम गोसावी, आप्पा गोसावी, प्रकाश गोसावी, अरविंद गोसावी, कालू गोसावी, सुदाम गोसावी, श्यामराव गोसावी, बटू गोसावी, राजू गोसावी, केदार गोसावी, पावबा गोसावी, संतोष गोसावी, साहेबराव गोसावी, विनोद गोसावी, लहू गोसावी, दगडू गोसावी, रामपुरी गोसावी अशा अनेक प्रमुख कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा डॉक्टर सुप्रिया गावित, भाजप तालुकाध्यक्ष दीपक पाटील, सोमूभैया गिरासे, मुन्ना दादा पाटील, सरपंच सचिन धनगर, उपसरपंच भीमराव गोसावी, तुकाराम धनगर, दीपक बच्छाव, निलेश धनगर, डॉक्टर प्रवीण धनगर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या नेतृत्वाखाली तालुक्याचा विकास वेगाने होत असल्याचे पाहूनच आपण भाजपमध्ये प्रवेश केल्याचे कार्यकर्त्यांनी यावेळी सांगितले. त्यांच्या या प्रवेशामुळे आगामी काळात भाजपला अधिक बळ मिळणार आहे.

## तळवे ग्रामपंचायतीत शेत पाणंद रस्ते विशेष मोहीम: शेतकऱ्यांना वृक्ष वाटप

**बोरद । मंगेश पाटील**

तळवे ग्रामपंचायतीत आज पाणंद रस्ते विशेष मोहीम (शेत रस्ते) या विषयावर विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले. या मोहिमेअंतर्गत शेतकऱ्यांच्या शेतीपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक असलेल्या पाणंद रस्त्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तहसीलदार दीपक धिवरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, पाणंद रस्ते हे शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असून त्यांची गरज सर्वाधिक आहे. शासनाच्या या विशेष मोहिमेचा लाभ प्रत्येक शेतकऱ्याने घ्यावा. या प्रसंगी सहाय्यक गटविकास अधिकारी पवार, विस्तार अधिकारी भैय्यासाहेब निकुंभे, तलाठी राहुल कोकणी, कोतवाल विलास पाडवी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




ग्रामपंचायत तळवेचे सरपंच मोग्या भिल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेत उपसरपंच आशाबाई शिंदे आणि ग्रामपंचायत सदस्यांसह विविध विभागांचे कर्मचारी तसेच गावातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमात ग्रामपंचायतीच्या वतीने तहसीलदार यांच्या हस्ते शेतकऱ्यांना वृक्ष वाटप करण्यात आले. प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या बांधावर वृक्ष लागवड करून पर्यावरण संवर्धनास हातभार लावावा, असे आवाहन करण्यात आले.

## परळीत होणाऱ्या भव्य एल्गार महासभेस हजारोच्या संख्येने उपस्थित रहा-गायकवाड

**केज । प्रतिनिधी**

आपल्या न्याय्य हक्कासाठी,संघर्षासाठी सतत लढणारे श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र,युवकांचे हृदयसम्राट सुजातदादा आंबेडकर पहिल्यांदाच परळी शहरात सोमवार दि.२९ सप्टेंबर रोजी आगमन करीत आहेत. वंचित समाजाच्या आवाजाला बळ देणारा हा ऐतिहासिक क्षण ठरणार असून,त्यांच्या स्वागतासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने भव्य एल्गार महासभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या महासभेचे उद्घाटक युवा नेतेप्रा.किसन चव्हाण राष्ट्रीय महासचिव असणार असून मार्गदर्शनासाठी फारूख अहमद राज्य उपाध्यक्ष,प्रवक्त्या सविताताई मुंडे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी शैलेश कांबळे बीड पूर्व जिल्हा अध्यक्ष,अजय सरवदे बीड पश्चिम जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के बीड पूर्व युवा जिल्हाध्यक्ष तर कार्यक्रम अध्यक्षपदी मिलिंद घाडगे बीड जिल्हा महासचिव उपस्थित राहणार आहेत.प्रमुख उपस्थितीत खंडुनाना जाधव बीड जिल्हा पश्चिम महासचिव, प्रसन्नजीत रोडे बीड जिल्हाउपाध्यक्ष,ड. संजय रोडे बीड जिल्हा सहसचिव,बालासाहेब जगतकर बीड जिल्हा प्रसिद्धीप्रमुख,सचिन उजगरे बीड जिल्हा उपाध्यक्ष धम्मानंद कासारे बीड हे नेते सहभागी होणार आहेत.परळी शहरात होणाऱ्याभव्य एल्गार महासभेस हजारोच्या संख्येने उपस्थित रहा असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते लिंबराज गायकवाड यांनी केले आहे. सुजातदादा आंबेडकर यांच्या स्वागताला ऐतिहासिक रूप द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



## नरदेहाची किंमत कळण्यासाठी परमार्थाची गरज-ह.भ.प.स्मिता आजेगांवकर

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

माणूस जन्माला येतो, लहानाचा मोठा होतो. पुढे सुख दुःखाची अनेक वादळे झेलत आयुष्य जगतो.पण आयुष्य का जगतो? कशासाठी जगतो? आणि कुणासाठी जगतो? याची मात्र काहीच कल्पना नसते हे सत्यच आहे नरदेहाची किंमत कळाली पाहीजे या साठीच परमार्थ आहे आणि तो साधण्याचे काम मनुष्य जीवनातून व्हावे असे मत प्रख्यात महिला किर्तनकार ह.भ.प.स्मिता आजेगांवकर यांनी व्यक्त केले.किर्तन महोत्सवा निमित्ताने त्या बोलत होत्या.हरिभक्ती पर किर्तनात विवेचन करताना त्या म्हणाल्या की,मृत्यूनंतर पृथ्वीतला वरचं मनुष्याच अस्तित्व कायमचंच संपुष्टात येतं संत हे अध्यात्मा प्रमाणे जीवन जगले म्हणून त्यांची आठवण येतच राहते.कारण ते त्यांनी मिळवले आहे.अध्यात्म सांगत जगावं तर ते समाजासाठी तुम्ही कोणत्या समस्या सोडवता? तुम्ही परिवारावर काय संस्कार करता? तुम्ही कुणाच्या कामी येता? हेच तुमच्या जीवनाचे सार मृत्यू नंतर कळते. स्वतःच्या पलीकडे जाऊन जेव्हा मनुष्य विचार करतो म्हणजे तो शिक्षण घेतो असं म्हणतात.जीवन जगताना संकुचित विचार नसला पाहीजे जगण्यात समाजाचा विचार म्हणजेचआयुष्य होय.खूप पैसा,प्रतिष्ठा, चांगला स्वभाव,क्षणिक व भौतिक सुखाची साधने आहेत.ती आता असतील पुन्हा नसतील विशेष म्हणजे यातील एकही वस्तू तुम्ही निर्वाणानंतर तुमच्या सोबत घेऊन जाऊ शकत नाहीत. समाजाची आपुलकी, आणि वर्षानुवर्षे निघणारी आठवण हीच आयुष्यभराची कमाई असते साधु संत स्मरणात राहतात कारण त्यांचे जगणे हे समाजासाठी असते.



संतांनी ग्रंथाव्दारे जगाला अनमोल शिकवण दिली. लाभलेल्या नरदेहाचे सार्थक झाले पण सामान्य माणूस भवसागरातच इतका अडकतो की ना उपासना ना सखोल ज्ञान ना अनुभव प्राप्त होतो.किर्तनाच्या उत्तररंगात त्यांनी समर्थ रामदास स्वामी यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला.स्मिता आजेगांवकर यांचे स्वागत जयश्री गोस्वामी,मनिषा गोस्वामी यांनी केले.

हार्मोनिअमसाठी बी.के. पांडे,तबल्यासाठी रत्नदिप शिगे यांनी साथसंगत केली.सार्थक गोस्वामी यांनी आभार मानले.यावेळी रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुरूवातीला किर्तन महोत्सवाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, लक्ष्मीकांत गोस्वामी, शैलेष कुलकर्णी आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.

## दै.मराठवाडा साथीचे संपादक सतिश बियाणी यांचे दु:खद निधन

**बीड । प्रतिनिधी**

येथील दै.मराठवाडा साथीचे संपादक सतिशमोहनलाल बियाणी यांचे आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५७ वर्षे होते. कै. सतिश बियाणी यांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केली जात आहे.

दैनिक मराठवाडा साथीचे संपादक म्हणून सतिश बियाणी यांनी पत्रकारिता क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. परळी शहरातील अनेक पत्रकार घडवण्याचे काम त्यांच्या माध्यमातून झाले. स्व. मोहनलालजी बियाणी यांनी सुरू केलेल्या दैनिक मराठवाडा साथीच्या भरभराटीमध्ये सतीश बियाणी यांचा मोलाचा वाटा होता. वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांनी मराठवाडा साथीचे वटवृक्षात रूपांतर केले. धार्मिक, राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यामध्ये ते सहभागी होत असत. मराठवाडा साथीच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. गेल्या काही दिवसापासून ते आजारी होते. त्यांच्यावर रुग्णालयात उपचारही सुरू होते. उपचार सुरू असतानाच संभाजीनगर येथील एका खाजगी दवाखान्यांमध्ये त्यांनी आज दिनांक १२ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजण्याचे सुमारास त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कै. सतीश बियाणी यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, पत्नी, मुलगी, मुलगा, भावजई, नातवंडे असा भरगच्च परिवार आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077